लघुकथा

: पान ३ वरून :

: पान ३ वरून :

आपल्या धार्मिक पद्धतीमुळें लग्नांत ठायीं ठायीं बायकोची जरुरी भासणार!"

माधवला एकदम म्हणावंसं वाटलं–

"तूं तर आहेस ना? तुझ्यावर आमच्या घरांतलं सगळ्यांचंच किती प्रेम बसलंय्. तूं मधूनमधून घरीं आली नाहींस तर आई जेवतांना हळूं विचारते–

"माधव, निर्मलेशीं भांडलास वाटतं? फार चांगल्या मनाची पोर आहे बरं ती. नांवासारखीच निर्मल. अरे, ती घरकामांत मदत करते. परवांच पहा ना माझं दांडीवर वाळत घातलेलं फाटकं पातळ तिनं पाहिलं न् सुईदोरा शोधून काढून स्वतःच शिवायला बसली. पातळाची अशी सुरेख घडी घातलीन् कपाटांत ठेवून दिली. माधव, तुझ्या संसाराची अशी घडी घालण्यासाठीं ती तुला आधीं भेटायला हवी होती रे–आधीं भेटायला हवी होती!"

पण माधवनं यांपैकीं अक्षरही निर्मलेला कधीं सांगितलं नाहीं.

माधवनें रौद्रावतार धारण केला. कशाला पण! तिनेंच ना तुझ्याविरुद्ध बॉसकडें अर्ज केला होता. छी:! केवढी गलिच्छ भाषा वापरली होती. तिला हवाय् फक्त 'कुंकवाचा धनी!' माझ्यांत पुरुषार्थ नाहीं असं डिवचण्यानें कां मी तिचं घाणेरडं आव्हान स्वीकारणार आहे? निर्मला, खाणावळींत उष्ट खरकटं अन्न उरलं ना कीं, त्या शिळया अन्नाचें पुनः दुसऱ्या दिवशीं ताजे गरम पदार्थ करून वाढतात तिला कदाचित् वाटत असेल कीं तिचं उष्ट ताट मी चवीनं खाईन म्हणून! निर्मला, मी तसा राहीन पण या घाणेरडया बाईचं पुनः तोंड पाहाणार नाहीं."

सगळे लग्नगांवीं आले. कार्यालयांत प्रवेश करतात तो वरमंडळींच्या घरांत सगळयांत अग्रभागी सर्वांना दिसली ती हिरव्या शालूंत वावरणारी ठुमकत ठुमकत चालणारी मालती. माधवचा चेहरा मात्र पांढरा पडला! ही घिडका कशाला येथें? खालीं बहिणीचं लग्न लागलं होतं. लज्जाहोम, सप्तपदी वगैरे विधी सुरू होते. दोन तीन तासांपासून निर्मला कुठेंच दिसत नव्हती. मालती मात्र सारखी–मुद्दाम मुद्दाम माधव जवळून जात होती. लग्नविधी करतांना, कन्यादानाच्या वेळीं वगैरे तिनें मुद्दाम त्याला चिमटे काढले होते.

निर्मला कुठें आहे म्हणून माधव कार्यालयवर हिंडला. तो एका कोपऱ्यांत ती रडत बसलेली. आजवर प्रत्येक क्षणीं त्याला धीर देणारी तेजस्वी बिर्मला आतां रडत होती.

त्याला तिनें पाहिलं मात्र. स्वत: एक कागदाचं चिरोटं तिनं त्याच्या हातीं दिलं. ती मालतीनें निमाला लिहिलेली चिठ्ठी होती. शिस्पेन्सिलीनें लिहिलेली अक्षर तर चौथी पास झालेलं दिव्य वळण...

"हे पाहा निर्मलाबाई, तुम्ही माझ्या संसाराचा डाव अर्घ्यावर उधळून लावला आहे. पण लक्षांत ठेवा, तुमच्या या माधवरावाला मी स्वतःहून कधींच घटस्फोट देणार नाहीं. तुझा जर भ्रम असेल कीं यांच्या घरांत आपण गोड गोड बोलून शिरकाव करूं आणि नंतर त्यांच्याशीं लग्न करूं तर तो भ्रम खोटा आहे. तुझ्याविरुद्ध कायम मी अर्ज लिहिणार!"

° ° °

माधवचं डोकं हल्लीं मुळींच ठिकाणावर नाही. म्हणूनच तो चिडला आणि मला येऊन सांगूं लागला, "अप्पासाहेब, मला मार्ग दाखवा. या घिडकेपासून माझी सुटका करा!"

# मला मार्ग दाखवा!

तरीही त्याची निर्मलेनं परोपरीनं समजूत घातली होती. लग्नापुरतंच तिला बोलवावं असं ठरलं. निर्मलाकडें पाहिलं कीं, माधवला वाटे– "काय दैव विचित्र आहे पाहा! हिची गांठ एवढया उशीरां पडली! बिचारी जीवनांत दु:खी! भावंडांसाठीं त्याग केला न् पण त्यांनीं वयांत आल्यावर वेगळी घरटीं बांधली. हिच्याकडें ही प्रौढ अविवाहित म्हणून जग उपहासानें पाहाते. निमा, मांडवगणे कुटुंबावर किती निरलसपणें–प्रेम करते आहे. मालतीला वाटतं माझें हिच्याशीं वाईट संबंध आहेत. शेवटीं जीवन म्हणजे नाटकच! कुणाचं ते सुखान्त होत; कुणाचं शोकान्त."

° ° °

निर्मलेनं पत्र लिहिलं होतं. लग्न दोन तीन दिवसांवर आलं आतां विलासनगरहून निघायचं तरी मालतीचा पत्ता नाहीं; निरोप नाहीं. निर्मलेला मेल्याहून मेल्यासारखं झालं. ती मालतीचा डोळयांत आत्मा आणून वाट पाहात होती. तिला मालतीला समजावून सांगायचं होतं. "संसार सुखाचा कर." म्हणून मोठया बहिणीच्या मायेनं आशीर्वाद द्यायचा होता. माधव व आपले संबंध किती निरागस, निर्मल आहेत, हे पटवून द्यायचं होतं; तिच्या मनांतील गैरसमज दूर करायचे होते.

ही 'इंटरेस्टिंग केस' ऐकून मी सुन्न झालों आहे संपादकांचं तें पत्र मला आठवतं आहे– "लोकांना वास्तववादी लेखन आवडतं!"

खरं आहे लोकांना आवडत असेल असं वास्तववादी लेखन! लोक वकिलांच्या 'केसेस' मध्यें जिज्ञासापूर्वक लक्ष घालीतही असतील. पण ते दाखवणार आहेत कां माधवला सोडवणुकीचा मार्ग? मालती सुधारणार आहे कां? अशा अशिक्षित, अर्धवट व आडमुठया बायकांमुळें अनेक माधवांचे संसार बरबाद होतात; ते 'हिंदु कोड बिलां'तल्या बायकांचो बाजू घेऊन कायदेकानू करणाऱ्या अध्वर्युंना समजणार आहे का? आगरकरांना. हरी नारायण आपटयांना, गडकऱ्यांना कधीं वाटलं असेल कां–कीं अशा गरीब बिचाऱ्या 'यमू' असतात, बरीब बिचाऱ्या 'सिंधु' असतात. तसेंच गरीब बिचारे 'माधव'ही. १९६८ च्या काळांत असतात. त्यांना घटस्फोट मिळत नाहींत. त्यांना फक्त गौप्यस्फाट होतो आणि तो सहन न होऊन ते बिचारे आत्महत्या करतात! माझ्यांतला तत्त्वज्ञ असच कांहींतरी मनाशीं घोळीत होता!! ●●

शेती

लेखक : जे. एच्. ठोंबरे, एबी. .

# आय. आर. ८. भाताची नवीन सुधारलेली जात

प्रिय शेतकरी बंधूंनों,

बऱ्याच दिवसांपासून 'आपण' मध्यें शेती विषयासाठीं एक स्वतंत्र सदर असावें अशी माझी इच्छा होती. यापुढें या सदरामध्यें शेतीविषयीं माहिती पुरविण्याचे मी प्रयत्न करीन.

## भाताची नवीन सुधारलेली जात आय. आर.–८

आंतरराष्ट्रीय भात संशोधन केंद्रावर केलेल्या संकरामधून या जातीची निवड करण्यांत आली. ही ठेंगणी जात आहे. रोपे जोमदार व मजबूत असून भरपूर व न लोळणारी जात आहे. ही जात गरवी आणि हळवी नाहीं तर निमगरवी आहे. पावसाळी हंगामांत या जातीला तयार होण्यास साधारणपणें १२५ ते १३५ दिवस लागतात. जितकें खत जास्त घालाल तितकें जास्त पीक मिळतें. पानावरील करपा रोगास ही जात तायचुंग नटिव्ह–१ या जातीपेक्षां कमी प्रमाणांत बळी पडतें. या जातीची चव, अगर शिजण्याचें गुणधर्म आपल्याकडील भातासारखेंच आहेत.

ही जात इतर भातापेक्षां आणि तायचुंग नेटिव्ह–१ या जातीपेक्षा थोडी (१० ते १५ दिवस) उशीरा तयार होते. त्यामुळें खरीप हंगामांत आय. आर. ८ चें पीक घेणें इष्ट आहे.

## ही जात फायदेशीर कां?

भारतांत संशोधन केंद्रावर केलेल्या प्रयोगावरून असें दिसून आलें कीं, ही जात तायचुंग नेटिव्ह–१ पेक्षां २० टक्के अधिक उत्पादन देते.

तायचुंग नेटिव्ह १ या जाती ऐवजी आय. आर. –८ या जातीची पावसाळी हंगामांत लागवण करणें खालील कारणास्तव फायदेशीर ठरते.

१) २० टक्के जादा उत्पादन.

२) पानावरील कडाकरपा (ब्रॅक्टिरिअल ब्लाइट) रोगाला कमी प्रमाणांत बळी बडतें.

ही जात निमगरवी आहे. म्हणून दाणें तयार झाल्यावर पावसांत सांपडण्याची शक्यता कमी आहे; आणि सांपडली तरी हिच्या दाण्यांत थोडी सुप्तावस्था असल्यामुळें तिचे दाणें रोपावर उगवून नुकसान होण्याची शक्यत कमी आहे.

## आय. आर.–८ लागवडीची पद्धत:

### १) जमीन

मध्यम ते भारी परंतु उत्तम निचऱ्याची असावी. जमिनीला पाण्याचा पुरवठा असणें आवश्यक आहे.

### २) बियांस औषध लावणें

१) पेरणीपूर्वी बीं तीन टक्के मीठाच्या पाण्यात १० मिनिटें बुडवून ठेवावें व हलकें, पोकळ असें पाण्यावर तरंगणारें बी काढून टाकावें तळाशी राहिलेलें बीं नंतर बाहेर काढावें व दोन तीन वेळां स्वच्छ पाण्यानें धुवावें.

२) वरील ओलें बी स्ट्रेप्टोसायक्लीनच्या (०.६ ग्रॅम औषध किंवा अॅग्रीमासीन २४ लिटर पाण्यांत) द्रावणामध्यें १२ तास ठेवावें. नंतर ते सांवलीत वाळवल्यावर एक टक्का पारायुक्त औषध (२५ ग्रॅम औषध १० कि. ग्रॅ. बियांस ह्या प्रमणांत) त्यांस चोळावें.

### ३) वाफें तयार करणें

जपानी पद्धतिप्रमाणें गादी वाफे करावेंत. वाफें तयार करण्यांत येणाऱ्या जमिनींत एका गुंठ्यास एक गाडी कंपोस्टखत मिसळावें. गादी वाफ्यांतील जमिनीच्या वरच्या थरावर कंपोस्टखत आणि राख यांचा पातळ थर द्यावा. पेरणीपूर्वी प्रति गुंठ्यास दोन किलो अमोनियम सलफेटचा पहिला हप्ता द्यावा. दुसरा हप्ता पेरणीनंतर १५ दिवसांनीं गुंठ्यास दोन अमोनिया सल्फेट या प्रमाणांत द्यावा. वाफ्यावर बीं पातळ पेरावें, एकरीं १० ते १२ किलो यापेक्षां जास्त बीं पेरूं नये. अशी काळजी घेतल्यास भाताचीं रोपें लावणीसाठीं साधारणत: २० ते २५ दिवसांत तयार होतात.

## जमीन तयार करणें आणि खताचा वापर

पुर्व मशागतीनंतर एकरीं १० ते १५ गाडया कंपोस्ट खत चांगलें मिसळावें अगर चिखलणीच्या वेळीं २५०० किलो हिरवळीचें खत घालावें. चिखलणी चांगली झाल्यावर रोपलावणी उत्तम होते.

# जसें बींज तसें पीक

एकरीं ४० किलो नग, १५ किलो स्फूर आम्ल आणि १० किलो पाळाश दोन हप्त्यांत द्यावें. पहिला हप्ता चिखलणीच्या वेळीं आणि दुसरा हप्ता लावणीनंतर पांच आठवडयांनीं द्यावा. नग म्हणजे आमोनियम सल्फेट. स्फूरआम्ल म्हणजे सुपर फॉस्फेट आणि पालश म्हणजे पोटॅशियम सल्फेट.

## रोपलावणी

लावणीकरितां २० ते २५ दिवसांपेक्षां रोपें जुनीं असूं नयेत. एका चुडयांत ३ ते ४ रोपें लावावींत. चिखल खालीं बसल्यानंतर रोपें उथळ म्हणजे २.५ ते ३.५ सें मी. खोलीवर लावावींत. दोन चुडयांतील अंतर २० सें मी. गुणीले १५ सें. मी. ठेवावें. यामुळें फुटवे लवकर येण्यास मदत होते.

## आंतरगत मशागत

लावणीनंतर २–३ आठवडयांनीं पहिली कोळपणी करावी. त्यानंतर आठवडयांनीं दुसरी कोळपणी करावी.

## पाण्याची व्यवस्था

निचरा होणारी जमीन उत्तम. अशा जमिनींत पाण्याची पातळी ५ सें मी. पर्यंत ठेवावी. रोपें जमिनींत चांगलीं रुजल्यानंतर पाण्याची पातळी १० सें. मी. ठेवण्यास हरकत नाहीं. यापेक्षां जास्त पाणी खाचरांत ठेवणें हितावह नाहीं.

## पीक संरक्षणाचा कार्यक्रम

कीड आणि रोग याचा बदोबस्ताकरितां एकत्रित फवारणी करावी. अ) रोपांच्या वाफ्यावर दोन आठवडयांनीं ०.६ ग्रॅम स्ट्राटोसायक्लीन आणि ५० ग्रॅम कॉपर, ऑक्सीक्लोराईड ५० मि. मी. २० टक्के एन्ड्रीन २० लिटर पाण्यांत मिश्र करून फवारणी करावी. ब) रोप कांपणीनंतर १५ दिवसांनीं एकत्रित फवारा (कीड व रोग) व त्यानंतर २–३ आठवडयाच्या अंतरानें दुसरी व तिसरी फवारणी खालीं नमूद केलेल्या औषधांनीं करावी. (७५० मि. लि. २० टक्के एन्ड्रीन एक किलो ताम्रयुक्त औषध, ३ ग्रॅम स्ट्राटोसायक्लीन, ३०० लिटर पाण्यामध्यें)

## कांपणी

शेतांत भेसळ दिसत असल्यास ती ताबडतोब काढावी. फुलवर आल्यावर साधारणपणें ३० ते ३५ दिवसांनीं ९० टक्के लोंब्या पक्व झाल्यावर भात कांपणी करावी. मात्र फुलावर आल्यापासून ४० दिवसापेक्षां कांपणीला विलब देऊं नये.

## मळणी

भात पूर्णपणें वाळल्यावर नेहमीप्रमाणें झोडपणी पद्धतीनें अगर बैलाच्या साह्यानें अथवा मळणीयंत्र वापरून मळणी करावी.

## उत्पादन

सर्वसाधारणपणें २० ते २५ क्विंटल उत्पादन मिळतें.

आपणांला आय. आर. ८ हा भात करतांना ग्रामसेवक, शेतकीतज्ञ यांचें वारंवार सहाय्य मिळेल. महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळातर्फें देखील आवश्यक सल्ला मिळल. ही नवीन जात आपण पिकवावो आणि भारताच्या उत्पादनांत भर टाकावी हीच माझी सदिच्छा! ●●

## फांद्या आणि पानें

एक अत्यत विशाल असा वृक्ष होता. त्याच्या फांद्या विशाल आणि लांब लांब पसरलेल्या होत्या. एके दिवशीं त्या फांद्यांना गर्व झाला. त्या म्हणाल्या, 'ह्या वृक्षाचा डौल विशाल पण हें केवळ आमच्यामुळें जगाच्या नजरेंत भरत आहे... हें केवळ आमच्यामुळें शक्य झालें आहे.'

हें ऐकून बिचारी चिमुकली पानें थरारून गेली. तीं आपसांत कुजबुजलीं, 'कोणाला कांहींही वाटो, आपल्याला आपलें दुसऱ्यांना सांवली देण्याचें काम केलेंच पाहिजे.'

## रस्ता आणि प्रवासी

एकदां एक प्रवासी रस्त्याच्या एका टोकास उभा राहून त्याला विचारू लागला, 'हें रस्त्या, तूं कोठें जातोस?'

त्यावर रस्ता उत्तरला, 'तें मला काय माहीत? माझ्या दुसऱ्या टोकाला तूं तें विचार.'

–जयंतकुमार त्रिभुवन